"ऑपरेशन सिंदुर सन्मान" महारक्तदान शिबिरात ५७५ बॉटल विक्रमी रक्तसंकलन >>पान 2

देशातील कर्तबगार स्त्रियांचा आदर्श विद्यार्थिनींनी घ्यावा >>पान 3

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलडाणा जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्याशी संपर्क साधून सतर्कतेच्या सूचना दिल्यात >>पान 4

**सुविचार**
जीवनात सचोपणा राखा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 29 ■ मंगळवार, दि. 19 ऑगस्ट 2025 ■ पाने 8 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



आदेश भावोजींच्या घरी दुमदुमणार सनई-चौघड्यांचे सूर; ही अभिनेत्री होणार बांदेकरांची सूनबाई

आतील पान

# मुंबईसह राज्यभरात पावसाचे धुमशान

## मराठवाड्यात ढगफुटीसदृश्य पावसामुळे जनजीवन विस्कळीत





दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यभरात धुवाधार पाऊस सुरू आहे. मुंबई, कोकणासह विदर्भ, मराठवाड्यात अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. नवी मुंबई आणि ठाण्यातही मुसळधार पाऊस सुरू आहे. तर मराठवाड्यात पावसामुळे आतापर्यंत ६ जणांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं. सोमवार आणि मंगळवार असे दोन दिवस मुंबई, ठाणे, रायगड, पालघर आणि नाशिकच्या घाट परिसरासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलं आहे.

मुंबईतील सखल भागात पाणी साचलं आहे. पावसामुळे रस्ते वाहतूक मंदावली आहे.तर लोकल वाहतूकही उशिराने सुरु आहे. पावसामुळे मुंबईतील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तर मुंबईसह ठाणे आणि कोकणात पुढील ४८ तास रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

शाळांना सुट्टी जाहीर

खबरदारीच्या पार्श्वभूमी ठाणे, नवी मुंबई आणि बुलढाण्यात उद्या शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. बुलढाण्यातील चिखली आणि मेहकर तालुक्यात पावसाचा हाहाकार सुरू आहे. त्यामुळे फक्त या दोन तालुक्यातील शाळा उद्या बंद राहणार आहेत. दरम्यान पावसाचे अलर्ट लक्षात घेऊन उद्या शाळांना सुट्टी देण्यासंदर्भात निर्णय घेणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलंय.

मराठवाड्यात ६ जणांचा मृत्यू

मराठवाड्यात धुवाधार पावसामुळे ६ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामध्ये नांदेड ३, बीड २, हिंगोलीत १ जणाचा मृत्यू झाला. तर मराठवाड्यातील ५७ महसूलमंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

नांदेड जिल्ह्यात सोमवारी पहाटेपासून जोरदार पाऊस सुरु झाला. मुखेड तालुक्यात पहाटे झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे अनेक गावात हाहाकार उडाला. नांदेडमध्ये ४ ते ५ जण वाहून गेल्याची प्राथमिक माहिती मिळतेय. या आपत्तीमुळे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे. पूरात अडकलेल्यांना एसडीआरएफरच्या टीमने बाहेर काढलंय.

बुलढाण्यामध्ये अतिवृष्टी, शाळा बंदचा निर्णय

बुलढाण्याच्या चिखली आणि मेहकर तालुक्यात पावसाचा कहर पाहायला मिळाला. आज आणि उद्या तालुक्यातील सर्व शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला. बुलढाणा जिल्ह्याच्या चिखली आणि मेहकर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी सुरू आहे.

या अतिवृष्टीमुळे शहर आणि तालुक्यात बिकट प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी नदी नाले काठाच्या बाहेरून वाहत आहे. मन प्रकल्पाचे सर्व पाच दरवाजे अर्धा मीटरने उघडण्यात आले असून मन नदीकाठच्या गावांना व नागरिकांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

हिंगोलीत नदी-नाल्यांना पूर

हिंगोली जिल्ह्यात सुरू असलेल्या दमदार पावसाने ओढे नदी नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठी असलेली पैनगंगा नदी धोक्याच्या पातळीने वाहत आहे. विदर्भात होत असलेल्या पावसाचे पाणी हिंगोलीच्या ईसापूर धरणात येत आहे. त्यामुळे ईसापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढविला जात आहे. याच पैनगंगेने रौद्ररूप धारण केल्याचे बघायला मिळत आहे.

रायगडमध्ये अनेक भागात पाणी साचलं

रायगडमध्ये मुसळधार पाऊस सुरूच असून महाड मधील सखल भागात पाणी साचले आहे. महाड पोलादपूरच्या काही सकल भागांमध्ये पाणी साचल्याचे प्रकार दिसून येतोय. महाड शहरातील काही शाळांच्या पटांगणात प्रचंड प्रमाणात पाणी साचल्यामुळे विद्यार्थ्यांना भर पावसात चिखलामध्ये तालुका क्रीडा स्पर्धांची तयारी करावी लागत आहे.

## मुंबईतील पूर्व उपनगरांमध्ये पावसाची जोरदार बॅटिंग

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** राजधानी मुंबईत सलग तिसऱ्या दिवशी पावसानं हजेरी लावली आहे. आज पावसानं जोरदार हजेरी लावली आहे. आज मुंबईत पाऊस जोरदार झाल्यानं त्याचा रस्ते वाहतूक आणि रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाल्याचं पाहायला मिळालं. मुंबईतील वडाळा, मानखुर्द, गोवंडी, कुर्ला आणि टिळकनगर या भागात जोरदार पावसानं हजेरी लावली. त्यामुळं मानखुर्द, गोवंडी, कुर्ला आणि टिळक नगर येथे रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने हार्बर मार्गावरील लोकल उशिरानं धावत आहेत. मुंबईतील पूर्व उपनगरामध्ये जोरदार पाऊस झाला. यामुळं मानखुर्द, गोवंडी, कुर्ला आणि टिळक नगर येथे रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने हार्बर मार्गावरील लोकल सेवेवर परिणाम झाला आहे. हार्बर मार्गावरील लोकल उशिरानं धावत आहेत. पावसाचा जोर वाढल्यास लोकल सेवेवर अधिक फरक पडू शकतो, अशी माहिती आहे. सध्या हार्बर मार्गावरील लोकल २० ते २५ मिनिटे उशिराने सुरु आहे अशी माहिती आहे. रेल्वेच्या रुळांवर पाणी साचल्याने अतिशय धीम्या गतीने लोकल वाहतूक सुरू आहे. ज्या ज्या ठिकाणी धोका आहे, पाणी साचले आहे त्या त्या ठिकाणी मध्य रेल्वेने कर्मचारी उभे केले आहेत. लोकलची वाहतूक सुरक्षितरित्या सुरू रहावी यासाठी हे कर्मचारी उभे करण्यात आले आहेत.

## पश्चिम घाटमाथ्यावर पावसाचा जोर, कोयना धरणाचे दरवाजे उघडले

**मुंबई/प्रतिनिधी:** पश्चिम घाटमाथ्यावरील मुसळधार पावसामुळे कोयना धरणात पाण्याची आवक प्रचंड वाढली आहे. त्यामुळे धरणाचे दरवाजे दीड फुटाने उघडण्यात आले आहेत. कोयना धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचं जोरदार पुनरागमन झालंय. धरणात प्रति सेकंद ४० हजार क्युसेक पाण्याची आवक सुरू आहे. पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी धरणाचे दरवाजे दीड फुटाने उघडण्यात आल्याने कोयना आणि कृष्णा नद्यांच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. सध्या सातारा जिल्ह्यातील सर्व लघु मध्यम प्रकल्पांमधून पाणी सोडण्यात आलं आहे. सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाची संततधार सुरू आहे. धरणात प्रति सेकंद ४० हजार क्युसेक पाण्याची आवक सुरू आहे. त्यामुळे २४ तासांत कोयना धरणात तब्बल साडे तीन टीएमसी पाण्याची आवक झाली आहे. धरणातील पाणीसाठा ९६ टीएमसी झाला आहे. पावसाचे अजून बरेच दिवस बाकी असल्याने पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी धरणाचे दरवाजे उघडून कोयना नदीपात्रात विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

पाणलोट क्षेत्रात ३८५ मिलीमीटर पाऊस : कोयना धरण पाणलोट क्षेत्रात सध्या मुसळधार पाऊस कोसळत आहे. गेल्या चोवीस तासांत कोयनानगर येथे ११३ मिलीमीटर, नवजा येथे १५१ आणि महाबळेश्वर येथे १२१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. तब्बल ३८५ मिलीमीटर पावसामुळे कोयना धरणात ३.३५ टीएमसी पाण्याची आवक झाली.

## कोकणात वरुणराजाचे रौद्ररूप, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गला रेड अलर्ट; नागरिकांना धोक्याचा इशारा

**रायगड/प्रतिनिधी :** कोकणात पावसाचा जोर वाढताना दिसत असून, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तिन्ही जिल्ह्यांना हवामान विभागाने आज रेड अलर्ट जारी केला आहे. रायगड जिल्ह्यात उत्तर आणि दक्षिण भागांत जोरदार पावसाची बॅटिंग सुरू असून, प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेन, मुरुड आणि रोहा तालुक्यांमध्ये मुसळधार पावसासोबतच वाऱ्याचा जोर वाढलेला असून, या भागांत अति मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित स्थळी राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील प्रमुख सहा नद्यांच्या पातळीत हळूहळू वाढ होत असल्यामुळे संभाव्य पूरस्थितीचा धोका लक्षात घेऊन नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पेन तालुक्यातील भोगावती नदीची पाणीपातळी वाढण्याची चिन्हं आहेत. रायगडच्या दक्षिण भागामधील श्रीवर्धन म्हसळा मुरुड परिसरात देखील मुसळधार पाऊस कोसळतोय. श्रीवर्धन मसाला बाजारपेठेत पाणी साचल्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे.

रत्नागिरीत पावसाचा कहर

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूणमध्ये वशिष्ठी नदी पात्र भरून वाहत असून जुन्या बाजार पुलाजवळ पाणी साचले आहे. घाटमाथ्यावर पावसाचा जोर कायम आहे. चिपळूण शहरात रिपरिप सुरू असली तरी आजूबाजूच्या भागांत मुसळधार पावसामुळे वातावरण चिंताजनक बनले आहे. खेड तालुक्यात जगबुडी व नारंगी नद्यांना पूर आला आहे.

## नांदेड जिल्ह्यात रावणगावचे ग्रामस्थ गाढ झोपेत असताना आभाळ फाटले



**नांदेड/प्रतिनिधी :** मराठवाड्याच्या काही भागांमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. नांदेडच्या मुखेड तालुक्यात रविवारी रात्री ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने सहा गावं पाण्याखाली गेली आहेत. यापैकी दोन गावांमध्ये ८० नागरिक अडकून पडले आहेत. पाण्याची पातळी वाढल्याने या नागरिकांना वाचवण्यासाठी राज्य आपत्ती निवारण दलाला बोलावले आहे. लहान होड्या आणि बोटींच्या साहाय्याने नागरिकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. उद्गीर येथील धरणक्षेत्राच्या वरच्या भागात पाऊस झाला. त्यामुळे एका रात्रीत १८ फूट पाणी वाढले आहे.

धरणक्षेत्रात प्रचंड पाऊस झाल्याने मुखेड तालुक्यातील सहा गावं पूर्णपणे पाण्याखाली गेली आहेत. मुखेड तालुक्यात फारसा पाऊस झालेला नाही. मात्र, तालुक्याच्या सीमेवर असणाऱ्या उद्गीर येथील धरणक्षेत्रात मुसळधार पाऊस झाला आहे. रविवारी रात्री गावकरी झोपल्यानंतर रात्री दोनच्या सुमारास उद्गीर भागात ढगफुटीसदृश पाऊस झाला. त्यामुळे लेंडी नदीला पूर आला. मुखेड तालुक्यातील भेंडेगाव, बुद्रुक, भिंगोली, हसनाळ, रावणगाव, भासवाडी आणि मारजवाडी ही सहा गावं पाण्याखाली गेली आहेत. यापैकी चार गावांमधील नागरिकांना रात्रीच सुखरुपपणे बाहेर काढण्यात आले.

मात्र, रावणगाव येथील गावठाणात ८० जण अडकले आहेत. तर हसनाळ येथे नऊ जण अडकले आहेत. या सगळ्यांच्या मदतीसाठी सकाळी सहा वाजल्यापासूनच एसडीआरएफ, उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार संपूर्ण यंत्रणेसह बचावकार्यासाठी दाखल झाले आहेत.

## अमेरिकेच्या टॅरिफ वादाच्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदींनी बोलावली महत्त्वाची बैठक

### ७ केंद्रीय मंत्री उपस्थित राहणार

नवी दिल्ली : अमेरिकेनं भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादलं आहे.भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर अमेरिका २५ टक्के नियमित आणि अतिरिक्त २५ टक्के असं एकूण ५० टक्के शुल्क २७ ऑगस्टपासून लागू होणार आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सायंकाळी ६.३० वाजता महत्त्वाची बैठक बोलावली आहे. नरेंद्र मोदी यांनी आर्थिक सल्लागार परिषदेची बैठक बोलावली आहे. या बैठकीला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासह इतर ७ केंद्रीय मंत्री उपस्थित राहणार आहेत.

नरेंद्र मोदी यांनी आज सायंकाळी साडे सहा वाजता पंतप्रधान निवासस्थानी बैठक बोलावली आहे. या बैठकीत अमेरिकेनं भारतावर लादलेल्या टॅरिफ संदर्भात आणि चीनचे विदेश मंत्री वांग यी यांच्या आजपासून सुरु होणाऱ्या दोन दिवसांच्या भारत दौऱ्याबाबत चर्चा होऊ शकते. भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध ताणलेले असताना भारत आणि चीन यांच्यातील संबंध सुधारण्याची शक्यत आहे.

अमेरिकेनं भारतातून आयात केलेल्या वस्तूंवर १ ऑगस्टपूर्वी २५ टक्के टॅरिफ लागू केलं होतं. त्यानंतर त्यामध्ये २५ टक्क्यांची वाढ केली आहे. भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर अमेरिकेनं ५० टक्के आयात शुल्क २७ ऑगस्टपासून आकारण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळं भारताच्या निर्यातीवर परिणाम होऊन ४० अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या व्यवहारांवर परिणाम होऊ शकतो.

# इंडिया आघाडी उपराष्ट्रपती पदाची निवडणूक लढणार ?

## तामिळनाडूतील खासदाराचं नाव आघाडीवर

नवी दिल्ली : इंडिया आघाडीच्या घटकपक्षांची उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार निश्चित करण्यासाठी आज सायंकाळी बैठक होणार आहे. या बैठकीपूर्वी इंडिया आघाडीचे उमेदवार म्हणून तामिळनाडूचे द्रमुकचे राज्यसभा खासदार तिरुची सिवा यांचं नाव आघाडीवर आहे. तिरुची सिवा यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यास उपराष्ट्रपती पदाची निवडणूक बिनविरोध पार पाडण्याचा भाजपचा प्रयत्न अयशस्वी होऊ शकतो. भाजपनं पुढील वर्षी होणारी तामिळनाडूची विधानसभा निवडणूक लक्षात घेत सीपी राधाकृष्णन यांना उमेदवारी जाहीर केल्याचं बोललं जातंय. यामुळं भाजपनं द्रमुक, अण्णाद्रमुक आणि काँग्रेसपुढं धर्मसंकट निर्माण झालं होतं. द्रमुकनं राधाकृष्णन यांना पाठिंबा नाही दिला तर त्यांच्यावर टीका केली जाऊ शकते. मात्र, तामिळनाडूमधीलच नेता उपराष्ट्रपती पदाची निवडणूक लढवणार असल्यास त्याची तीव्रता कमी होऊ शकते. दुसरीकडे अण्णाद्रमुकला एनडीएच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याशिवाय पर्याय नाही.

द्रमुकचे तामिळनाडूमधील राज्यसभा खासदार तिरुची सिवा यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. यामुळं द्रमुक आणि काँग्रेसला तामिळनाडूच्या राजकारणात फार अडचण येणार नाही. एनडीएनं सीपी राधाकृष्णन यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर इंडिया आघाडीकडून बिहारमधील नेत्याला उमेदवारी दिली जाऊ शकते अशा चर्चा होत्या. मात्र, सीपी राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर द्रमुकनं तामिळनाडूतील नेत्याचं नाव जाहीर केलं जावं, अशी भूमिका घेतली.

द्रमुकच्या भूमिकेला काँग्रेसनं सहमती दर्शवली असल्याची माहिती आहे. तिरुची





सिवा हे तामिळनाडूमधील असून द्रमुकचे राज्यसभा खासदार आहेत. विरोधी पक्षांकडे उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विजय मिळवण्या इतकं संख्याबळ नसलं तरी तिरुची सिवा यांना उमेदवारी देत तामिळ अस्मितेच्या नावावर मतदारांपर्यंत संदेश देण्याचा प्रयत्न केला जाईल.

दुसरीकडे सत्ताधारी भाजपकडून उपराष्ट्रपती पदाची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. विरोधी पक्षांसोबत संपर्क साधला जात असून पाठिंबा देण्याचं आवाहन केलं जात आहे.

दरम्यान, उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेच्या खासदारांकडून मतदान केलं जातं. लोकसभा आणि राज्यसभेतील मिळून एनडीएकडे ४२७ खासदार आहेत. तर, इंडिया आघाडीकडे लोकसभा आणि राज्यसभा मिळून ३५५ खासदार आहेत. लोकसभेत एनडीएकडे २९३ आणि राज्यसभेत १३४ खासदार आहेत. तर, इंडिया आघाडीकडे लोकसभेत २४० आणि राज्यसभेत १०६ खासदार आहेत. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विजयासाठी बहुमताचा आकडा ३९२ इतका आहे.

दरम्यान, काल सीपी राधाकृष्णन यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांना फोन केला होता. आता उपराष्ट्रपती पदाची निवडणूक बिनविरोध पार पडणार की एनडीए आणि इंडिया आघाडी आमने सामने येणार हे पाहावं लागेल.

## लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय ठरु शकत नाही

लग्न न करता एकत्र राहण्याचे ( लिव्ह इन रिलेशनशिप) फॅड अलीकडे खूप वाढले आहे. विशेषतः शहरात राहणाऱ्या उच्चशिक्षित तरुण तरुणींमध्ये लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचे प्रमाण अधिक आहे. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये काही महिने राहून पहायचे जर एकमेकांचा स्वभाव पटला तर ठीक नाही तर ब्रेक अप करुन पुन्हा नवीन जोडीदार शोधून त्याच्यासोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहायचे असा हा प्रकार. ज्यांना विवाह संस्था मान्य नाही किंवा विवाह करायचा नाही असे तरुण तरुणी लिव्ह इन रिलेशनशिपला पसंती देत आहेत. केवळ अविवाहित तरुणच नाही तर घटस्फोटित व्यक्तीही लिव्ह इनमध्ये राहण्यास पसंती देत आहेत. लिव्ह इन रिलेशनशिपकडे विवाह संस्थेला पर्याय म्हणून पाहणारा मोठा वर्ग समाजात निर्माण होत आहे. भारतीय कायद्याने लिव्ह इन रिलेशनशिपला पूर्ण मान्यता दिलेली नसली तरी लिव्ह इन रिलेशनशिप कायद्याने बेकायदेशीर किंवा गुन्हाही ठरवलेला नाही. भारतीय कायद्याने या नात्याला काही प्रमाणात संरक्षण आणि अधिकारही दिले आहेत पण हे करताना कायद्याने काही मार्गदर्शक तत्वेही जारी केली आहेत. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांसाठी ही मार्गदर्शक तत्वे पाळणे बंधनकारक आहे. असे असले तरी या मार्गदर्शक तत्वांचे पालन संबंधित जोडप्यांकडून होते का हा संशोधनाचा विषय आहे. मुळात लिव्ह इन रिलेशनशिपची व्याप्तीच इतकी अस्पष्ट आहे की आपल्या अधिकाराची आणि कर्तव्याची लक्ष्मणरेषाच उभयंतांना समजत नाही त्यामुळे अशा संबंधात कालांतराने कटुता निर्माण होते. दोघांचे पटेनासे होते. विवाह संबंधांमध्ये एकमेकांविषयी जो आदर असतो तो तो लिव्ह इन मध्ये नसतो. दोघेही एकमेकांवर अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे वाद वाढत जातात. त्यांच्यात मध्यस्थी करणाराही कोणी नसतो त्यामुळे प्रकरण न्यायालयापर्यंत पोहचते. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांचा न्यायालयात पोहचण्याचा प्रकार अलीकडे खूप वाढला आहे. एकदा वाद न्यायायलात पोहचला की न्यायालयात हेलपाटे घालावे लागतात त्यामुळे संबंधितांचे जीवनही उध्वस्त होते. नातेवाईक, समाजातही अवहेलना होते. काही वेळा तर वाद इतका विकोप्यास जातो की वादातून खुनही होतो. दोन वर्षांपूर्वी दिल्लीतील श्रद्धा वालावकर या तरुण मुलीचा तिच्याच लिव्ह इन रिलेशनशिपमधल्या जोडीदाराने निर्घृणपणे खून केला होता. त्या घटनेने संपूर्ण देश हादरला होता. दिल्लीतील या घटनेची नंतर पुण्यातही पुनरावृत्ती झाली होती. लिव्ह इन रिलेशनशिपमधल्या या घटना पाहिल्या की लिव्ह इन मध्ये राहणे किती सुरक्षित आहे याचा विचार तरुणांनी करायला हवा. लिव्ह इन रिलेशनशिपला कायद्याने बेकायदेशीर ठरवले नसले तरी समाजाने अजूनही या नात्याला मान्यता दिलेली नाही. समाजाने अजूनही लिव्ह इन रिलेशनशिपला स्वीकारले नाही. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांकडे समाज समाज कुत्सित नजरेनेच पाहतो. म्हणजे ज्या सुखासाठी लिव्ह इन रिलेशनशिपचा मार्ग स्वीकारला ते सुख तर वाट्याला येतच नाही उलट दुःखच वाट्याला येते . खरंतर लिव्ह इन रिलेशनशिपला केवळ कायदेशीर दृष्टिकोनातून न पाहता सामाजिक आणि नैतिक दृष्टिकोनातून पाहिले तर कोणीही लिव्ह इन रिलेशनशिपचे समर्थन करणार नाही. स्त्री आणि पुरुष एकमेकांना पूरक असतात आणि त्या पूरकतेला बळ देण्यासाठीच अनादी काळापासून विवाह संस्था अस्तित्वात आली आहे. विवाह हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. विवाह संस्कृतीत काही त्रुटी असतीलही, विवाह झालेल्या जोडप्यांमध्ये पटत नाही, त्यांच्यात वाद होत नाही असे कोणी म्हणणार नाही. नवरा बायकोमध्येही वाद होतो. काहींचा वाद न्यायालयातही जातो. काहींचा घटस्फोटही होतो म्हणून विवाहच नको, लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय आहे असे कोणी समजत असेल तर ते चुकीचे आहे. लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय ठरू शकत नाही. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये दोन भिन्न लिंगी व्यक्ती एकत्र राहतात पण त्यांना एकमेकांप्रति जबाबदारीचे भान नसते. या उलट विवाह झालेल्या व्यक्तींना एकमेकांप्रति जबाबदारीचे भान असते केवळ जबाबदारीच नाही तर प्रेम, त्याग आणि तडजोडी बरोबरच विवाहात समर्पण भावनाही असते. मात्र पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधाणुकीकरण, भौतिकवादी दृष्टिकोन, इतरांपेक्षा काहीतरी वेगळे करून दाखवण्याची प्रवृत्ती यामुळे शहरात विशेषतः मेट्रो शहरात विवाह संस्थेवरच प्रहार केला जात आहे. आजची उच्चशिक्षित तरुण पिढी कोणत्याही जबाबदारी शिवाय बंधनमुक्त जीवन जगण्यास उत्सुक असल्याचे पाहायला मिळत आहे त्यामुळेच ते लिव्ह इन कडे वळत आहेत पण ते ही अटी आणि शर्तीवर बेतलेले असल्याने ते संबंधीही फार काळ टिकत नाही त्यापेक्षा समानता, प्रेम, त्याग आणि जबाबदारीची जाणीव असलेला विवाह लिव्ह इन रिलेशनशिपपेक्षा हजारो पटींनी चांगला आहे हे लिव्ह इनकडे वळणाऱ्या तरुणांनी समजून घ्यायला हवे.

# ''ऑपरेशन सिंदुर सन्मान'' महारक्तदान शिबिरात ५७५ बॉटल विक्रमी रक्तसंकलन

दैनिक आपला विदर्भ






**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्य उतपादन शुल्क, बुलढाणा विभाग व देशी विदेशी लिकर असोशिएसनमार्फत दि.१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी सहकार विद्या मंदीर सभागृह येथे ''ऑपरेशन, सिंदुर सन्मान'' महारक्तदान शिबीराचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात ५७५ बॉटल इतके विक्रमी रक्तसंकलन करण्यात आले. हे रक्तदान शिबीर अधीक्षक डॉ. पराग नवलकर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री मा. मकरंद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार धीरज लिंगाडे, संजय गायकवाड, आमदार श्वेता महाले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपवनसंरक्षक सरोज गवस, माजी आमदार विजयराज शिंदे, बुलढाणा अर्बन पतसंस्थाचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक, अध्यक्ष कोमल सुकेश झंवर, सामाजिक कार्यकर्ते रविकांत तुपकर, ॲड. जयश्री शेळके, ॲड. नाझेर काझी, अधीक्षक डॉ. पराग नवलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या महारक्तदान शिबीराचे उदघाटक जिल्ह्याचे पालकमंत्री ना.मकरंद पाटील, प्रमुख पाहुणे आमदार संजय गायकवाड यांनी या रक्तदान शिबीर आयोजनाबाबत राज्य उत्पादन शुल्क, विभागाचे कौतुक केले. तसेच पुढेही ही परंपरा कायम राहील यासाठी शुभेच्छा दिल्या.

**महारक्तदान शिबिरात सात रक्तपेढ्यांचा सहभाग**

या महारक्तदान शिबिरात रक्त संकलित करण्याकरिता शासकीय रक्तपेढी बुलढाणा, शासकीय रक्तपेढी शेगांव , शासकीय रक्तपेढी खामगांव, लिलावती रक्तपेढी, बुलढाणा, जनकल्याण रक्तपेढी, जालना, दत्ताजी भाले रक्तपेढी, छत्रपती संभाजी नगर, डॉ. हेडगेवार रक्तपेढी, अकोला इत्यादी रक्तपेढीकडून रक्त संकलनाची जबाबदारी पार पाडण्यात आली.

यावेळी सामाजिक कार्यकर्त्या ॲड. जयश्री शेळके यांनी या शिबीरात आपले मत व्यक्त केले आहे. राज्य उतपादन शुल्क अधीक्षक डॉ. पराग मो. नवलकर यांनी शिबीरास प्रत्यक्षपणे सहकार्य करणा-यांचे तसेच रक्तदाते आणि देशी विदेशी लिकर असोशिएसनचे आभार व्यक्त केले.

या महारक्तदान शिबीराचे प्रास्ताविक करतांना डॉ. पराग नवलकर यांनी शिबीराविषयी माहिती दिली. या शिबीराचे सूत्रसंचालन राज्य उत्पादन शुल्कचे दुय्यम निरीक्षक रमेश विठोरे, यांनी केले असून तसेच जिल्ह्यातील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी सुध्दा या महारक्तदान शिबीरास उपस्थिती दर्शवून रक्तदान करुन सेवाकार्यात सहभाग नोंदविला.

**डॉ. पराग नवलकर यांचे विक्रमी रक्तसंकलन**

''माझ्या ३५ वर्षाच्या कारकिर्दीमध्ये राज्य उत्पादन शुल्क, विभागाने रक्तदान शिबीर राबविण्यासारखे महान कार्य करण्याचे प्रथमतः बघत आहे. व अशा कार्यक्रमाला आमच्या शुभेच्छा आहेत व यापुढे. सुध्दा असे कार्यक्रम या विभागामार्फत होत राहोत यासाठी शुभेच्छा देतो.''
– ना.मकरंद पाटील, पालकमंत्री, बुलढाणा.

डॉ. पराग मोरेश्वरराव नवलकर यांनी यापूर्वीसुध्दा राज्य उत्पादन शुल्क, विभागाच्या वतीने यवतमाळ, वाशिम, अहिल्यानगर, जालना या जिल्ह्यात रक्तदान शिबीर राबविले असून आतापर्यंत एकूण ८५८६ बॉटल इतके विक्रमी रक्तदान संकलनाचा यशस्वी विक्रम केलेला आहे. तसेच बुलढाणा येथे सुध्दा ५७५ बॉटल इतके विक्रमी रक्तदान संकलन झालेले आहे. असे एकूण ९१६१ बॉटल इतके विक्रमी रक्तसंकलन झालेले आहे.

## आदेश भावोजींच्या घरी दुमदुमणार सनई-चौघड्यांचे सूर; ही अभिनेत्री होणार बांदेकरांची सूनबाई

**मुंबई/प्रतिनिधी:** दार उघड बये, दार उघड..., अवघ्या महाराष्ट्रातील वहिनींना अशी साद घालणाऱ्या भावोजींच्या घरी लवकरच सनई-चौघड्यांचे सूर वाजणार आहेत. महाराष्ट्राचे लाडके भावोजी आदेश बांदेकर आता लवकरच सासरे म्हणून मिरवणार आहेत. बांदेकरांचा लेक लवकरच आपली लग्नगाठ बांधणार असून सुप्रसिद्ध अभिनेत्री बांदेकरांची सूनबाई होणार आहे. प्रसिद्ध मराठी अभिनेते आदेश बांदेकर आणि सुचित्रा बांदेकर हे मराठी कलाविश्वातील लोकप्रिय जोडपं. आई-वडिलांप्रमाणेच आदेश बांदेकर आणि सुचित्रा बांदेकर यांचा लेक सोहम बांदेकरनंही मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. स्टार प्रवाह वाहिनीवरील नवे लक्ष्य या मालिकेतून त्यानं छोट्या पडद्यावर पदार्पण केलं. नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणानं चर्चेत असणारं बांदेकर कुटुंबीय सध्या प्रोफेशनल लाईफमुळे नाहीतर वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. बांदेकरांचा लेक सोहम लवकरच विवाहबंधनात अडकणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे.

राजश्री मराठीनं दिलेल्या वृत्तानुसार, आदेश बांदेकर आणि सुचित्रा बांदेकर यांचा लेक सोहम लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. अभिनेत्री पूजा बिरारीसोबत सोहम आपली साताजन्माची गाठ बांधणार असून लवकरच लग्नाचा बार उडणार आहे. राजश्री मराठीनं सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. त्या पोस्टनुसार, सोहम बांदेकर येड लागलं प्रेमाचं फेम पूजा बिरारीसोबत लग्न करणार आहे. सोहम आणि पूजा यांच्या लग्नाच्या चर्चांना उधाण आलं आहे. मात्र, यावर अद्याप आदेश बांदेकर किंवा सुचित्रा बांदेकर यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. त्याचबरोबर सोहम किंवा पूजानं त्यांच्या लग्नाबाबत अजून कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. मराठमोळी अभिनेत्री पूजा बिरारी लवकरच बांदेकर कुटुंबाची सूनबाई होणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. मराठी टेलिव्हिजन विश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी पूजा बिरारी २९ वर्षांची आहे. तिनं साजणा मालिकेतून मालिकाविश्वात पदार्पण केलं.

## तालूक्यातील सर्व शाळा, कॉलेज व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर

**मेहकर /प्रतिनिधी:** तालूक्यातील पेनटाकळी प्रकल्प, कोराडी प्रकल्प व परतापूर व देऊळगाव सकार्शा येथील धरणामधून मोठ्याप्रमाणात पाण्याचा विसर्ग होत असल्यामुळे रस्ते बंद होण्याची संभाव्यता आहे. त्यामुळे मेहकर तालूक्यातील सर्व शाळा, कॉलेज व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. व पूढील ३ दिवस अतीवृष्टीचा इशारा असल्यामुळे कोणीही कामाशीवाय बाहेर पडू नये. असे आवाहन मेहकर तहसिलदार निलेश मडके यांनी १९ ऑगस्ट रोजी केले आहे.

## मलकापूर शहरातील गणेशोत्सव मिरवणुक व विसर्जनाच्या कालावधीत वाहतूक मार्गात बदल; जिल्हाधिकारी यांचे आदेश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** मलकापूर शहरात मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. या कालावधीत गणेश मंडळाकडून मिरवणुक व विसर्जनाच्या दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी शहरातील वाहतुक दि. २७ ऑगस्ट २०२५ व दि. ६ सप्टेंबर २०२५ रोजी पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

मलकापूर शहरातील गणेशोत्सव काळात वाहतुकीचे नियोजन करण्यात आले असून दि. २७ ऑगस्ट २०२५ रोजी १२ वाजेपासून ते रात्री १२ वाजेपावेतो तसेच दि. ६ सप्टेंबर रोजी १२ ते रात्री १२ वाजेपावेतो वाहतुक मार्गात पर्यायी व्यवस्था केली आहे.

पर्यायी मार्ग याप्रमाणे : बुलढाणादाताळामलकापूर मार्गे मुक्ताईनगर, नांदुरा, भुसावळकडे जाणारी वाहने दाताळा टोलनाका-घिणी-बेलाड-एनएच ५३ वरुन, मुक्ताईनगर-धरणगाव-मलकापूर मार्गे-दाताळा-मोताळा-बुलढाणा जाणारी वाहने एनएच-५३ ने बेलाड फाटा-बेलाड-घिणी-दाताळा-टोलनाका मार्गे बुलढाणा, एनएच-५३ ने मलकापूर मार्गे दाताळा-मोताळा-बुलढाणा जाणारी वाहने एनएच ५३ ने बेलाड फाटा-बेलाड-घिणी-दाताळा-टोलनाका मार्गे बुलढाणा, बोदवड-मलकापुर मार्गे मुक्ताईनगर नांदुरा-खामगांव जाणारे वाहने बोदखेडे-वानखेडे पेट्रोलपंप-दाताळा-घिर्णी-बेलाड-बेलाड नांदुरा-मुक्ताईनगर या पर्यायी मार्गाने वाहतुक वळविण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना व वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले असून, आदेशाचे उल्लंघन झाल्यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३१ अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भावामुळे बैलपोळा साध्या पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यामध्ये लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव असल्याने प्राण्यामधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियम २००९ नुसार प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे दि. २२ ऑगस्ट रोजीचा बैलपोळा सण साधा व घरगुती पद्धतीनेच साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्राण्यामधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियम २००९ नुसार जिल्ह्यात अधिसूचना जारी करण्यात आली असून रोगाचा प्रसार रोखण्यासाठी सर्व विभागांना प्रतिबंधात्मक खबरदारी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शुक्रवार दि. २२ ऑगस्ट रोजी बैलपोळा सण साजरा होणार आहे. या दिवशी बैल एकत्र करून सण साजरा केल्यास किंवा शर्यतींचे आयोजन झाल्यास लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर सर्व पशुपालकांनी साध्या पद्धतीने सण साजरा करण्यासाठी दक्षता घ्यावी, अशा सूचना सर्व संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. तसेच हा अनुसूचित रोग असल्यामुळे प्रादुर्भाव नियंत्रणासाठी शासकीय, निमशासकीय वा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून कार्यवाहीत दिरंगाई किंवा अडथळा आढळल्यास प्राण्यामधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियम २००९ मधील कलम ३१, ३२ व ३३ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. याची सर्व संबंधित विभागांनी तसेच पशुपालकांनी गंभीर दखल घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे शेती बांधावर, नुकसान झालेल्या शेतीची व घरांची केली पाहणी





**अमरावती/प्रतिनिधी:** अमरावती जिल्ह्यात मुसळधार पाऊस व पूर परिस्थितीमुळे हजारो हेक्टर वर शेती पिकांचे नुकसान झालं आहे, त्यामुळे अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी तिवसा तालुक्यातीलगावांत दौरे करून प्रत्यक्ष शेती बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली, ढगफुटी सदृश्य आलेल्या प्रचंड पावसामुळे गावकऱ्यांचे घरांचे, मालमत्तेचे, शेतीचे नुकसान झाले आहे, खासदार बळवंत वानखडे यांनी थेट गावामध्ये व शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी गावकऱ्यांच्या झालेल्या शेतीच्या नुकसानाची, मालमत्तेच्या नुकसानाची भरपाई गावकऱ्यांना शासन स्तरावरून मिळवून देण्याच आश्वासन खासदार बळवंत वानखडे यांच्या वतीने देण्यात आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### जालन्यात सुप्रीम कोर्टाच्या आदेशावरुन गणपती उत्सवात डीजेवर बंदी



**जालना/प्रतिनिधी :** अवघ्या काही दिवसावर गणपती उत्सव येऊन ठेपला असून, प्रशासनाच्या वतीने व पोलीस विभागाच्या वतीने पूर्ण तयारी झाली आहे. या संदर्भात जालना जिल्ह्यातील जे पण काही अट्टल गुन्हेगार आहेत, त्यांना हद्दपारची कारवाई सध्या पोलीस विभागाकडून सुरू करण्यात आली आहे. सर्व डिव्हिजनल वर योग्य त्या बैठका संबंधित यांच्याकडून घेतल्या आहे. अशी माहिती जालना जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक आयुष्य नोपानी यांनी दिली आहे. तसेच सुप्रीम कोर्टाच्या आदेशावरून गणपती उत्सवात दरम्यान कुठल्याही गावात व कुठल्याही मिरवणुकीत चालणार नाही १००% डीजेवर बंदी आहे. डीजे वाजवल्यास योग्य ती कारवाई संबंधित गणपती मंडळावर केली जाईल, असा इशारा यावेळी त्यांनी दिला आहे.

### जिल्ह्यातील मच्छीमारांसाठी मासेमारी साधनांवर अर्थसहाय्य योजना; १५ सप्टेंबर अर्ज मागविले

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत मासेमारी साधनांवर अर्थसहाय्य या योजनेंतर्गत अनुदान दिले जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील मच्छीमार सहकारी संस्थेचे क्रियाशील सभासद तसेच वैयक्तिक क्रियाशील मच्छीमारांनी १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्त म.वि. जयस्वाल यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत तयार नायलॉन मोनोफिलेमेंट जाळी खरेदीसाठी प्रति सभासद/मच्छीमारास २० किं.ग्रॅमपर्यंत ५० टक्के अनुदान मंजूर आहे. जाळ्याची किंमत प्रतिकिलो कमाल ८०० रुपयेपर्यंत ग्राह्य धरली जाणार आहे. तसेच बिगर यांत्रिकी नौका खरेदीच्या ५० टक्के अनुदान किंवा प्रकल्प किंमत यापैकी जे कमी असले तेवढे अनुदान देय राहिल. लाकडी नौका प्रकल्प किंमत ६० हजार कमाल अनुदान ३० हजार रुपये, पत्रा नौका प्रकल्प किंमत ३० हजार रुपये कमाल अनुदान १५ हजार रुपये, फायबर नौका प्रकल्प किंमत १ लाख २० हजार रुपये कमाल अनुदान ६० हजार रुपये किंवा नौका खरेदीच्या ५० टक्के अनुदान देय राहिल.

मासेमारी साधनांवर अर्थसहाय्य या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक मच्छीमारांनी आवश्यक कागदपत्रांसह व संबंधित संस्थेच्या शिफारसीसह आपले प्रस्ताव सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), बुलढाणा यांच्या कार्यालयात १५ सप्टेंबरपर्यंत सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावेत. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), प्रशासकीय इमारत, पहिला माळा, बसस्टँड समोर, धाड रोड, बुलढाणा- ४४३००१ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू; उणे प्राधिकार पत्रावर निधीआरहित करण्यास मान्यता; मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्यात नैसर्गिक आपत्तीत नागरिकांचा मृत्यू, झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना तात्काळ मदत मिळावी, जखमी नागरिकांना मदत मिळावी यासाठी शासनाने उणे (-) प्राधिकार पत्रावरून रक्कम आरहित करण्याबाबत यापूर्वीच परवानगी दिली आहे. त्यानुसार संबधित जिल्हाधिकाऱ्यांनी नैसर्गिक आपत्तीमुळे बाधितांना मदत देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले आहेत.

मंत्री श्री. जाधव पाटील यांनी सांगितले, अतिवृष्टीमुळे घरांची पडझड, घरे पूर्णपणे बाधित किंवा अंशतः बाधित झाल्यास त्याचेही तातडीने पंचनामे करून त्यांना मदत देण्यात यावी. तसेच टपरीधारक, छोटे व्यावसायिक यांचे नुकसान झाल्यास अशा बाधितांचे तातडीने पंचनामे करून या बाधितांना जलद मदत देण्यात यावी. ही मदत त्यांना तातडीने मिळावी यासाठीही शासनाने उणे (-) प्राधिकार पत्रावरून रक्कम आरहित करण्यास शासनाने या पूर्वीच परवानगी दिली आहे.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार गेल्या दोन ते तीन दिवसा पासून सुरू असलेल्या अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या घरांच्या नुकसानीचे, जनावरांचे, मनुष्यहनी मुळे बाधितांना तत्काळ मदत मिळावी त्यांना दिलासा देण्याचे प्रशासनाने काम करावे. तसेच या बाधितांना शासन निकषानुसार मदत करावी, असेही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील निर्देश दिले आहेत.

# देशातील कर्तबगार स्त्रियांचा आदर्श विद्यार्थिनींनी घ्यावा

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे आवाहन

## मीराबाईंच्या भजनाचे गायन आणि विवेचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडून विशेष बक्षीस जाहीर

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील कर्तबगार स्त्रियांचा आदर्श आजच्या विद्यार्थिनींनी घेऊन आपापल्या क्षेत्रात अग्रेसर राहिले पाहिजे, असे गौरउद्गार उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी काढले.

सिडनहॅम महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आणि आशिया खंडातील पहिल्या महिला वाणिज्य पदवीधर श्रीमती यास्मिन खुर्शीदजी सर्वेअर यांच्या पदवीला शंभर वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या पहिल्या महिला कर्मचारी श्रीमती यास्मिन सर्वेअर यांच्या सन्मानार्थ बँकेच्या प्रायोजकत्वाने महाविद्यालयात स्थापित केलेल्या श्रीमती सर्वेअर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, कु. यास्मिन सर्वेअर यांनी १८ ऑगस्ट १९२५ रोजी सिडनहॅम महाविद्यालयातून वाणिज्य शाखेत पदवी संपादन केली होती. त्या काळात महिलांसाठी उच्च शिक्षण घेणे हे दुर्मिळ मानले जात असल्याने त्यांचा हा प्रवास ऐतिहासिक ठरला आहे. आज वाणिज्य क्षेत्रात आपला ठसा उमटविणाऱ्या महिलांना श्रीमती यास्मिन सर्वेयर यांनी शंभर वर्षांपूर्वी वाणिज्य विभागाचे दालन खुले करून दिले. आजच्या विद्यार्थिनींसाठी त्या प्रेरणास्थान आहेत. यावर्षीपासून महाविद्यालय व सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने सिडनहॅम महाविद्यालयात वाणिज्य विभागात पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थिनी साठी श्रीमती यास्मिन सर्वेयर यांच्या नावाने एक लाख रुपयांची विशेष शिष्यवृत्ती सुरू करण्यात येत आहे.

माजी विद्यार्थिनी व प्रसिद्ध पार्श्वगायिका संजीवनी भेलांडे यांनी इंग्रजीमध्ये अनुवादित केलेल्या मिराबाई यांच्या रचना सादर केल्या. याचे औचित्य साधून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी महाविद्यालयासाठी एका नवीन स्पर्धेची घोषणा केली. दर महिन्याला मीराबाईंची एक रचना संजीवनी भेलांडे देतील, त्याचे अर्थपूर्ण विवेचन स्वतःच्या आवाजात करणाऱ्या विद्यार्थी- विद्यार्थिनीस पंचवीस हजारांचे रोख पारितोषिक देण्यात येईल. या उपक्रमाची सुरुवात आतापासूनच करूयात असे आवाहनही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहातील विद्यार्थ्यांना केले.

**मीराबाईंच्या भजनाचे गायन आणि विवेचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष बक्षीस जाहीर**

उपस्थित विद्यार्थ्यांपैकी मीराबाईंच्या भजनाचे वाचनआणि विवेचन करणाऱ्या पाच विद्यार्थ्यांना मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी रुपये दहा हजार रोख बक्षीस दिले. राज्यातील एकल महिलांच्या सबलीकरण आणि सशक्तीकरणासाठी राज्य शासन त्यांना पेन्शन आणि व्यवसाय उभारण्यासाठी मदत करण्याच्या विचारात आहे. तसेच डॉक्टर होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये होणाऱ्या नाविन्यपूर्ण विविध कोर्सेस आणि उपक्रमांचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी कौतुक केले. यावर्षीपासून महाविद्यालय व सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने सिडनहॅम महाविद्यालयात वाणिज्य विभागात पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थिनी साठी श्रीमती यास्मिन सर्वेयर यांच्या नावाने एक लाख रुपयांची विशेष शिष्यवृत्ती सुरू करण्यात येत आहे, अशी घोषणा मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी यावेळी केली.

या कार्यक्रमास मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी श्रीमती आंचल गोयल, डॉ. होमी भाभा स्टेट विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रजनीश कामत, सिडनहॅमच्या माजी विद्यार्थिनी श्रीमती दिलनवाज वारीयावा, प्रसिद्ध पार्श्वगायिका संजीवनी भेलांडे, यास्मिन सर्वेयर यांचे नातेवाईक श्री सोली कूपर, सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या श्रीमती पॉपी शर्मा, सिडनहॅम महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीनिवास धुरु यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य डॉ. श्रीनिवास धुरु यांनी सर्वांचे आभार मानले.

### पालकमंत्री पदाबाबत निर्णय घेण्याचा सर्वस्वी अधिकार मुख्यमंत्र्यांचा- शिक्षणमंत्री दादा भुसे

**नाशिक /प्रतिनिधी:** याबाबत सर्वस्वी अधिकार मुख्यमंत्री यांची आहे. ते जे निर्णय घेतील त्याची अंमलबजावणी आम्ही करू, ध्वजारोहणचं पालन आम्ही केलं. ते पद राहील तरच प्रश्न सुटतील असे नाही.पालकमंत्री पदाबाबत निर्णय घेण्याचा सर्वस्वी अधिकार मुख्यमंत्री यांचा आहे. अशी प्रतिक्रिया शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, दुपारी मुंबई मोठ्या प्रमाणात पाऊस झाला.वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. आणखी अलर्ट देण्यात आला आहे. अधिकाऱ्यांना स्थानिक परिस्थिती पाहून अधिकार दिले.शाळा बंद बाबत ते अधिकारी निर्णय घेतील. आता फक्त मुंबईतील शाळा बंद आहे. स्थानिक परिस्थिती बघूनच निर्णय करावे, पालकांना आणि विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. मुख्याध्यापकांना वाटल तर ते निर्णय घेऊ शकतात. काही भागात पाऊस कमी पडला. पिके करपायला लागली होती.पिकांपुरता पाऊस येतोय. पण काही भागात अजूनही मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे. पालकमंत्री पदाबाबत सर्वस्वी अधिकार मुख्यमंत्री यांचे आहेत.ते जे निर्णय घेतील त्याची अंमलबजावणी आम्ही करू, ध्वजारोहणचं पालन आम्ही केलं. ते पद राहील तरच प्रश्न सुटतील असे नाही.अशी प्रतिक्रिया शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### काँग्रेस कमिटी च्या तालुकाध्यक्ष पदी जैनुल आबेद्दीन शेख यांची निवड



**डोणगाव/प्रतिनिधी:** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्यांक विभागाच्या तालुकाध्यक्ष पदी जैनुल आबेद्दीन शेख यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्वानुमते झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

जैनुल आबेद्दीन शेख हे अनेक वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असून, पक्ष संघटनेत त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी यापूर्वी युवक काँग्रेस शहर अध्यक्ष तसेच महासचिव, बुलढाणा जिल्हा युवक काँग्रेस अशी महत्त्वाची पदे भूषविली आहेत. विविध पदांवर कार्य करताना त्यांनी युवकांना संघटित करून पक्ष बळकट करण्यास मोलाचे योगदान दिले आहे. ते लोकांच्या सेवेसाठी अविरत झटणारे, सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर राहणारे आणि युवकांना सकारात्मक दिशादर्शन करणारे उत्साही युवा नेते म्हणून ओळखले जातात.

निवडीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना जैनुल आबेद्दीन शेख यांनी पक्षाच्या विचारधारेनुसार कार्य करत जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी, पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी आणि अल्पसंख्यांक समाजाच्या हक्कासाठी नेहमी लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला.

या निवडीचे श्रेय त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ, अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष व माजी आमदार डॉ. वजाहत मिर्झा, जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे, रिसोड-मालेगाव मतदारसंघाचे आमदार अमित झनक, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष मोहतेश्याम रजा, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस हरीश रावळ, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष लक्ष्मण दादा घुमरे, माजी नगराध्यक्ष तथा मुस्लिम कोअर कमिटीचे जिल्हाध्यक्ष अलहाज कासमभाई गवळी, अल्पसंख्यांक विभागाचे महाराष्ट्र सचिव मोहम्मद वसीमोद्दीन, काँग्रेस नेते इरफान पठाण आदींना दिले आहे.

या निवडीबद्दल तालुक्यातील आणि जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत असून, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आता पंचनामे नको सरसकट मदत करा शिवसेना उबाठाच्या वतीने मागणी

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी:** दिनांक १४ ऑगस्ट पासून निसर्गाच्या प्रकोपामुळे सतत ढगफुटी सदृश्य पाऊस होत असल्यामुळे संपूर्ण धरण पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत अति पावसामुळे नदी नाले ओसंडून वाहत आहेत त्यामुळे नद्यांचे पाणी शेतामध्ये गेल्यामुळे नदीकाठच्या परिसरातील संपूर्ण शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे हळदीसारखी पिक लावलेले असताना त्यामध्ये सिंचनाची व्यवस्था करण्याकरिता ठिबक संच सुद्धा लावण्यात आलेली आहेत पुराच्या पाण्यामुळे ठिबक संचाचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून इतर शेती उपयोगी साहित्याची सुद्धा अतोनात नुकसान झालेले आहे शेती पिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च सुद्धा आजपर्यंत शेतकऱ्यांनी केला आहे परंतु निसर्गाच्या वक्रदृष्टीमुळे सातत्याने होत असलेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे पिकाचे व शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे पिकाबरोबर शेतातील माती ही वाहून गेली आहे त्यामुळे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे सदर झालेले नुकसान कोणत्याही मदतीने भरून निघू शकत नाही परंतु झालेल्या आघातामुळे कोलमडलेला शेतकरी पुन्हा उभा करण्यासाठी सरकारने मदत करणे अपेक्षित आहे कारण पिक विमा पद्धतीमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात बदल केल्यामुळे शेतकरी अक्षरशः गोंधळून गेलेला आहे ई पीक पाहणी सुद्धा व्यवस्थित होत नाही अशातच शेतकऱ्याचे सरसकट नुकसान झालेले आहे सरकारने सरकारी यंत्रणेचा वापर करून पंचनाम्यात वेळ घातल्यापेक्षा शेतकऱ्यांनी घेतलेले संपूर्ण पीक कर्ज माफ करून आता सरसकट मदत करण्याशिवाय पर्याय नाही पंचनाम्यात वेळ घालविणे म्हणजेच शेतकऱ्याची थट्टा करणे तसेच पुढाऱ्यांनी सुद्धा शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन फोटोग्राफीचे नाटक केल्यापेक्षा शासन स्तरावर सरसकट मागणीचा आग्रह धरावा जेणेकरून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत होईल याकरिता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रिसोड विधानसभा सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप उपजिल्हाप्रमुख डॉक्टर चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे रिसोड तालुक्याच्या वतीने शेतकऱ्याची संपूर्ण कर्जमाफी करून झालेल्या नुकसानीबाबत सरसकट शेतकऱ्यांना भरीव मदत करावी पिक विमा पद्धतीतील केलेले बदल रद्द करून पूर्ववत करावे अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्यालयाकडे ई-मेल द्वारे केली असल्याची माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे रिसोड तालुका समन्वयक घनश्याम मापारी यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे दिली आहे.

## शालार्थ प्रणालीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची माहिती अद्यावत करण्याचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील सर्व अनुदानित व अंशतः अनुदानित प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी शालार्थ प्रणालीत आपल्या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची माहिती अद्यावत करावी, असे स्पष्ट निर्देश प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी दिले आहेत.

शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते शासन निर्णय ७ नोव्हेंबर २०१२ अन्वये शालार्थ या प्रणालीद्वारे अदा केले जातात. त्यासाठी आवश्यक कागदपत्रे मुख्याध्यापकांनी त्यांच्या लॉगिनवरून अपलोड करणे बंधनकारक आहे. या अनुषंगाने शिक्षण आयुक्तांनी नुकत्याच घेतलेल्या ऑनलाईन बैठकीत विहित कालमर्यादेत काम पूर्ण करण्याचा आढावा घेतला होता.

याबाबत बुलढाणा जिल्हा परिषदेच्या श्री छत्रपती शिवाजी सभागृहात झालेल्या बैठकीत प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपशिक्षणाधिकारी उमेश जैन, प्राथमिक वेतन पथक अधीक्षक पंकज गवई, सुभाष थोंबाळे तसेच जिल्ह्यातील सर्व खाजगी प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. शिक्षणाधिकाऱ्यांनी ७ नोव्हेंबर २०१२ ते ७ जुलै २०२५ या कालावधीतले वैयक्तिक मान्यता आदेश, शालार्थ आयडी आदेश, संस्थेचे नियुक्ती आदेश आणि संबंधित कर्मचाऱ्यांचे रुजू अहवाल ही सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात १३ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार शाळांनी अंमलबजावणी करणे बंधनकारक असल्याचे सांगितले. अद्याप तीन शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवण्यात आलेले नसल्याने त्यांनी ते तातडीने बसवावेत, असेही निर्देश देण्यात आले. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी सेवेच्या शर्ती १९८१ अधिनियम, बिंदू नामावलीची प्रमाणितीकरण प्रक्रिया, तसेच शिक्षकांना दुय्यम सेवा पुस्तके अद्यावत करण्याबाबतही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. २० ऑगस्टपर्यंत सर्व शाळांनी बिंदू नामावली विभागाकडे सादर करणे आवश्यक असून ३० ऑगस्टपर्यंत दुय्यम सेवा पुस्तके अद्यावत करून अहवाल सादर करावा लागेल. तसेच शाळांमध्ये सखी सावित्री समिती गठीत करणे, तक्रार पेटी बसवणे, नियमित बैठकांचे आयोजन करणे या बाबींचेही पालन करणे बंधनकारक असल्याचे सांगून कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलडाणा जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्याशी संपर्क साधून सतर्कतेच्या सूचना दिल्यात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार अतिवृष्टीचा धोका लक्षात घेता शाळकरी विद्यार्थ्यांना सुट्टी देण्याची आणि शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांना सुखरूप घरी पोहोचवण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना सोबत आपत्ती व्यवस्थापन विभागाचं पथक सतर्क ठेवाण्याच्या आणि नदीकाठच्यागावांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत

बुलढाणा जिल्ह्यामध्ये गेल्या दोन दिवसापासून पावसाची संततधार सुरू आहे तर हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशाराही दिला आहे १८ ऑगस्टच्या सकाळपासूनच जिल्ह्यात पाऊस सुरू आहे सकाळीच केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला जिल्ह्यातील पाणी परिस्थितीची माहिती जाणून घेतली अतिवृष्टीचा हवामान खात्याने दिलेला इशारा लक्षात घेता परिस्थितीनुसार शाळांना सुट्टी द्यावी व विद्यार्थी शाळेत आलेले असतील तर त्यांना सुखरूप घरपोच सोडण्याची व्यवस्था करण्यात यावी या संदर्भात संबंधित विभागातील गटविकास अधिकारी व तहसीलदारांना सूचित करावे आपत्ती विभागाचे पथक ही अलर्ट मोडवर ठेवावेत नदीकाठच्या गावाकडे विशेष लक्ष ठेवाण्याच्या सूचनाही यावेळी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांना दिल्यात



## विविध वृत्त...

### हर हर महादेवच्या गजरात कावड मंडळाची खामगावात भव्य मिरवणूक







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** हर हर महादेव' च्या गजरात श्रावण महिन्याच्या शेवटच्या शहरातून भव्य कावड यात्रा काढण्यात आली. कावडयात्रा उत्सवाला शहरात वर्षागणिक भव्य-दीव्य स्वरूप येत आहे. शहरातून निघालेल्या कावडयात्रेत कावडधारी मंडळ सहभागी झाले होते. 'हर बोला महादेव' च्या गजराने अवघे शहर दणाणून गेले होते. श्रावण महिना हिंदु संस्कृतीत अतिशय पवित्र मानला जातो. श्रावणातील सोमवारला विशेष महत्व असून सोमवारी शिवपिंडीला पवित्र जलाव्दारे अभिषेक घालण्याची परंपरा आहे. त्यामुळे प्रत्येक श्रावण सोमवारी शिवभक्त कावडधारी वेगवेगळ्या तिर्थस्थळावरून पवित्र जल आणून शिवमंदीरात जलाभिषेक करीत असतात. उत्सवांचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खामगाव शहरात या कावड यात्रा उत्सवाला भव्य-दिव्य स्वरूप येताना दिसत आहे. प्रत्येक श्रावण सोमवारी शहरातील विविध मंडळांचे शेकडो कावडधारी तीर्थस्थळांवरून खांद्यावर कावड घेवून जल आणत असतात. आज श्रावणातील शेवटचा सोमवार असून श्री मानाची कावडधारींनी चांगदेव मुक्ताई येथून पवित्र जल आणून वाजत-गाजत कावडधारींची शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये श्री नवयुवक मानाची कावड मंडळाच्या वतीने आघोरी पूजा चा देखावा सादर करण्यात आला.

### संकटात शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी तातडीने मदतीची गरज - तुपकर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** गेल्या चार दिवसांपासून विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील शेतकरी ढगफ ुटी आणि अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झाला आहे.. हजारो जनावरे महापुरात



तडफडून मेलीत, उभी पिकं जमिनीसकट वाहून गेलीत, शेकडो कुटुंबांची घरे कोसळून संसार उघड्यावर आलाय.. शेतकऱ्यांच्या आयुष्यभराची मेहनत, पैसा, घाम, स्वप्नं- सगळं एका रात्रीत पाण्याने गिळलं..नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात एका शेतकऱ्याच्या पन्नास म्हशी गोठ्यासकट वाहून गेल्या.. अशा अनेक शेतकऱ्यांची २०० पेक्षा जास्त जनावरे मृत्यूमुखी पडलीत..बुलढाण्यात तर शेतकऱ्यांची जमीनच मातीसकट खरडून गेलीय..त्यांच्यासमोर 'जगावं तरी कसं? राखरांगोळी झालेल्या संसारातून उभं राहावं तरी कसं?' असा प्रश्न आहे..या संकटात शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी तातडीने मदतीची गरज ही, ही खरी सरकारच्या संवेदनशीलतेची कसोटी आहे..फक्त घोषणा करून, पंचनाम्याचं नाटक करून, पाहणी दौरे करून शेतकऱ्यांच्या दुःखाचा तमाशा करू नका.

### बुलढाणा जिल्ह्याला पुढील तीन दिवस ऑरेंज अलर्ट, जिल्हा प्रशासन मोडवर

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यात कालपासून धो धो पाऊस पडत आहे, त्यामुळे जिल्ह्यातील सर्वात मोठे असलेले खडकपूर्णा धरणाचे संपूर्ण १९ दरवाजे ५० सेंटीमीटरने उघडण्यात आले आहेत, तर पेनटाकळी धरणाचे देखील ९ दरवाजे उघडण्यात आले होते, नदी नाल्यांना पूर आल्याने जिल्ह्यातील ८ ते ९ मार्ग वाहतुकीसाठी बंद पडले होते, परंतु आता पुराचे पाणी ओसरल्याने या सर्व मार्गावरील वाहतूक पूर्ववत सुरळीत करण्यात आली आहे, मात्र पुढील तीन दिवस बुलढाणा जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट देण्यात आल्याने जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर आहे.नागरिकांनी वाहत्या पाण्यातून जीवघेणा प्रवास करू नये.अत्यावश्यक कामासाठीच घराबाहेर पडावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

## ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाची मलकापूर, संग्रामपूर व जळगाव जामोद तालुका कार्यकारिणी गठीत



दैनिक आपला विदर्भ

**मलकापूर/प्रतिनिधी:** ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाची १७ ऑगस्ट रोजी मलकापूर संग्रामपूर व जळगाव जामोद तालुका आढावा बैठक घेण्यात आली. दरम्यान तीनही तालुका अध्यक्षांची नियुक्ती करून नूतन कार्यकारिणी गठित करण्यात आली.

संघटनेचे राज्य सल्लागार डॉ. शिवशंकर गोरे, जिल्हाध्यक्ष किशोर पवार,जिल्हा सचिव विठ्ठल पाटेखेडे, जिल्हा उपाध्यक्ष संतोष सातव, कार्यकारिणी सदस्य गजानन हुडेकर यांच्या उपस्थितीत बैठकी झाल्या. यावेळी बुलढाणा जिल्हा सहसंघटकपदी सुधीर दाते, मलकापूर तालुकाध्यक्ष संजय उमाळे, संग्रामपूर तालुकाध्यक्ष शामलकुमार कौलकार,जळगाव जामोद तालुकाध्यक्ष तुषार आसोलकर यांची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी मलकापूर कार्यकारिणीत दिगंबर किनगे सरचिटणीस, अनिल खर्चे संघटक, विनोद क्षीरसागर सचिव, श्रीकृष्ण सोनोने कार्याध्यक्ष, सुभाष सपकाळ व मिलिंद बगाडे सहसंघटक,राजेश टप सहसचिव, प्रवीण राणे,प्रवीण बगाडे व सुनील चौधरी उपाध्यक्ष,विष्णू चोपडे प्रसिद्धीप्रमुख,शंकर बोंडे सहसंघटक, प्रमोद वानखडे सह प्रसिद्धीप्रमुख, गणेश बोचरे सदस्य, तर जळगाव जामोद मध्ये अनिल ढगे सरचिटणीस, शेख मुजम्मील शेख इस्माईल संघटक, शेख रहीम शेख रउफ प्रसिद्धीप्रमुख तसेच संग्रामपूर मध्ये अनिल धनभर सहसंघटक, संजय दामधर कार्याध्यक्ष, देविदास बावस्कार सहसचिव, श्रीधर धुरडे व शंकर बगाडे उपाध्यक्ष, गोपाल अमृतकर सचिव,श्रीकृष्ण इघोकार सरचिटणीस, मधुकर ढगे प्रसिद्ध प्रमुख, गोपाळ ढगे सहसंघटक, राजेश बोडखे संघटक म्हणुन नियुक्ती करण्यात आली.यावेळी निळकंठ चिकाटे व इतरही ओबीसी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## जिल्ह्यात पावसाचा सतर्कतेचा इशारा प्रशासनाने दिल्या तात्काळ सूचना

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी:** : हवामान विभागाने दिलेल्या सततच्या इशाऱ्याबाबत कळविण्यात येते की, जिल्ह्यात २१ ऑगस्ट २०२५ पर्यंत भारतीय मौसम विभाग केंद्र नागपूर यांनी पावसाचा सतर्कतेचा इशारा दिला आहे. या इशाऱ्याची गांभीर्याने दखल घेऊन खालीलप्रमाणे उपाययोजना तात्काळ करण्यात याव्यात.

तहसीलदारांनी सर्व महसूल मंडळ अधिकारी, तलाठी व ग्रामसेवकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात. गावस्तरावरील कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याबाबत सूचित करावे.

गावपातळीवर ग्रामपंचायतीमार्फत नागरिकांना इशाऱ्याची माहिती देऊन आवश्यक त्या खबरदारीच्या उपाययोजना सांगण्यात याव्यात.

जिल्ह्यात पूल खचले असतील तर तातडीने दुरुस्तीचे काम व रस्त्यावर पडलेले खड्डे बुजावावे. याबाबत संबंधित विभागाने काम सुरु करावे. जेणे करून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. आपत्कालीन मदत कार्यासाठी नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवावा.

आपल्या विभागातील पथके तयार ठेवावी शोध व बचाव साहित्य तयार ठेवावे. धरणे, नाले, नद्या व तलावांमध्ये पाण्याची पातळी नियमित तपासून अहवाल पाठवावा. शाळा, इमारती, सामुदायिक सभागृह व सुरक्षित स्थळे तात्पुरत्या निवारा केंद्रासाठी तयार ठेवावीत.

आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यास त्वरित जिल्हा नियंत्रण कक्षाला माहिती देऊन मदतकार्य सुरू करावे. नदी नाल्याच्या पुलावरुन पुराचे पाणी वाहत असल्यास दुचाकी, चारचाकी, बैलगाडीने जाणे टाळावे. जे रस्ते पुरामुळे वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेली आहे त्या ठिकाणी गावस्तरीय समितीमधील कर्मचारी, कोतवाल यांना उपस्थित ठेवावे. हवामान अंदाजाबाबत माहिती करीता नागरिकांनी सचेत ॲपचा वापर करावा. पुराच्या पाणी, धरणक्षेत्र, पर्यटन ठिकाणी जाऊन सेल्फी काढणे, रिल बनविणे इत्यादी प्रकार टाळावे. असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी दिले आहे.

## अतिवृष्टी, पुरामुळे होणाऱ्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांचे निर्देश

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्यात सध्या पावसाचा जोर वाढला असून हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील काही दिवसही पावसाचा जोर कायमराहणार आहे. अतिवृष्टी आणि यामुळे निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीमुळे राज्यात शेत पीक, फळ बागांचे नुकसान झाल्यास संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी नुकसानीचे तातडीने पंचनामे करून त्याचा अहवाल विनाविलंब सादर करावा, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले आहेत

मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले, भारतीय हवामान विभागाने विदर्भ, मराठवाडा, कोकण या भागात पुढील चार दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. प्रशासनाने या भागातील नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी सर्तक रहावे.

मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले, शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या घटकांना त्वरित मदत व दिलासा मिळावा यासाठी प्रशासनाने अतिवृष्टी, पुरामुळे बाधितांचे तातडीने पंचनामे करावेत. या नुकसानीचा अहवाल संबधित विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करावा, असेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

## जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला राज्यस्तरीय यश; राज्य आरोग्य मानांकनात पहिले स्थान

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत घेण्यात आलेल्या राज्य आरोग्य मानांकनात बुलढाणा जिल्हा एप्रिल व मे २०२५ मध्ये दोन महिने सतत राज्यात प्रथम क्रमांकावर आला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी आरोग्य विभाग व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांचे अभिनंदन केले आहे. तसेच अत्तिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजित मंडाले, जिल्हा माता बाल संगोपण अधिकारी डॉ. मिलींद जाधव, सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. हरी पवार, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, जिल्हा हिवताप अधिकारी शिवराज चौहान व आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त कामगिरीमुळे शक्य झाले असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी म्हटले आहे. आरोग्य सेवेत कार्यक्षम नियोजन, विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय आरोग्य अभियानांची प्रभावी अंमलबजावणी तसेच जनतेपर्यंत पोहोचवलेली दर्जेदार सेवा या यशामागील महत्त्वाचा घटक असल्याचे त्यांनी नमूद केले. यापुढेही बुलढाणा जिल्हा आरोग्य विभागाने अशीच कामगिरी करून राज्यातील इतर जिल्ह्यांना आदर्श घालून द्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## रस्त्यावरील खड्डा ठरतो जीवघेणा

दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**उमराखेड :** उमराखेड तालुक्यातील ढाणकी गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुसऱ्या गेटसमोरील रस्त्यावरील पुलावर तीन फ ूट खड्डा पडला आहे आणि या खड्ड्यामुळे अनेक लहान-मोठे अपघात होत आहेत. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की जर हा खड्डा लवकर बुजवला नाही तर या खड्ड्यामुळे मोठा अपघात घडेल आणि लोकांचे जीव धोक्यात येतील.

रस्त्यावर असलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना या खड्ड्यांचा अंदाज येत नाही आणि अपघात होण्याची शक्यता वाढते. स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी या खड्ड्यांची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. या खड्ड्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे आणि लोकांची गैरसोय होत आहे. प्रशासनाने या समस्येकडे लक्ष देऊन नागरिकांचे जीव वाचवण्यासाठी लवकरात लवकर खड्डा बुजवावेत अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.




## बुलढाणा जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी; नद्याकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** भारतीय हवामान विभागाने बुलढाणा जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी केला असून, जिल्ह्यात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्हा प्रशासनाने नागरिकांना विशेषतः नदीकाठी वसलेल्या गावांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

पेनटाकळी खडकपूर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात सध्या जोरदार पाऊस सुरू असल्याने धरणाच्या पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे धरणाचे दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग वाढवण्याची शक्यता आहे. परिणामी, पेनटाकळी आणि खडकपूर्णा नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होऊन पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना संयम राखण्याचे आणि प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

### प्रशासनाच्या नागरिकांना महत्त्वाच्या सूचना आणि आवाहन

* नदीपात्रात जाऊ नका: कोणत्याही परिस्थितीत नदीच्या जवळ किंवा नदीपात्रात जाण्याचे टाळा. पाण्याचा विसर्ग वाढल्याने प्रवाहाचा वेग अत्यंत वेगाने वाढू शकतो.
* जनावरे सुरक्षित ठेवा: आपली जनावरे नदीच्या परिसरापासून दूर आणि सुरक्षित ठिकाणी ठेवा.
* पाण्यात उतरू नका: पूर आलेल्या पाण्यातून गाडी चालवू नका किंवा चालत जाऊ नका.
* विद्युत प्रवाहापासून दूर राहा: तुटलेल्या विजेच्या तारा, खांब आणि पाण्याच्या संपर्कात आलेल्या विद्युत उपकरणांपासून दूर राहा.
* सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या: शक्य असल्यास उंच ठिकाणी आश्रय घ्या.
* लहान मुले आणि ज्येष्ठांची काळजी घ्या: त्यांना सुरक्षित आणि आरामदायक ठिकाणी ठेवा.
* दूषित पाणी पिऊ नका: पूर आलेले पाणी दूषित असू शकते, त्यामुळे ते पिऊ नका. पिण्यासाठी फक्त सुरक्षित पाणी वापरा.
* अफवांवर विश्वास ठेवू नका: समाजात अफवा पसरवल्या जाण्याची शक्यता असते. कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नका आणि शांतता राखा.
* प्रशासनाच्या सूचनांचे पालन करा: आपत्कालीन परिस्थितीत मदत लागल्यास, तहसीलदार, स्थानिक प्रशासन, पोलिस नियंत्रण कक्ष किंवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाशी तात्काळ संपर्क साधा.

### महत्त्वाचे संपर्क क्रमांक

* जिल्हा पोलिस नियंत्रण कक्ष बुलढाणा:
  * दूरध्वनी क्रमांक: ०७२६२२४२४००
  * मोबाइल क्रमांक: ९४२२८८०११३
* जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, बुलढाणा:
  * दूरध्वनी क्रमांक: ०७२६२ २४२६८३
  * टोल फ्री क्रमांक: १०७७
  * मोबाइल क्रमांक: ७०२०४३५९५४